**नियमित दिवाणी दावा क्र. ६९/२०२४ मधील**
**निशाणी क्रमांक ५९ खालील आदेश**
**(CNR No. MHWS050003552024 )**

१) प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ७ हिचेतर्फे तिला लेखी जबाब दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून लेखी जबाब स्विकारण्यासाठी दिलेला आहे.

२) सदरचा अर्ज वाचला. त्यास वादी हिच्या विधीज्ञांनी त्याच अर्जावर दिलेले लेखी म्हणणे विचारात घेतले. प्रतिवादी क्र. ७ हिचेतर्फे विधिज्ञ श्री. पी.जी.चव्हाण यांचा आणि वादी हिचेतर्फे विधीज्ञ श्री.एम.डी. वरघट यांचा युक्तिवाद ऐकला.

३) प्रतिवादी क्र.७ हिच्या विधिज्ञांनी असा युक्तिवाद केला की, वादी व प्रतिवादी क्र. ७ यांच्यामध्ये प्रस्तुतचा दावा आपसात करण्यासाठी प्रयत्न चालू होते त्यामुळे प्रतिवादी क्र. ७ हिचेतर्फे प्रस्तुतचा अर्ज त्यांचा लेखी जबाब दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून मिळण्यासाठी दिलेला आहे आणि प्रतिवादी क्र.७ हिचेतर्फे प्रस्तुतचा अर्जासोबत दाखल केलेला लेखी जबाब अभिलेखावर घेण्यात यावा.

४) याउलट वादी यांच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्र. ७ हिने जाणीवपुर्वक विहीत मुदतीत तिचा लेखी जबाब दाखल केलेला नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. ७ हिचा प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

५) अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, प्रतिवादी क्र.७ ही दिनांक २३.९.२०२४ रोजी वकीलपत्र निशाणी १९ अन्वये हजर झाली परंतू प्रतिवादी क्र. ७ हिने तिचा कायदेशीर मुदतीत लेखी जबाब दाखल केलेला नाही.

६) दिवाणी प्रक्रीया संहिता, १९०८ मधील आदेश ८ नियम १ नुसार दाव्याचे समन्स मिळाल्यापासून जास्तीत जास्त ९० दिवसांच्या आत प्रतिवादीने तिचा लेखी जबाब दाखल करणे आवश्यक आहे. प्रतिवादी क्र. ७ ही दिनांक २३.९.२०२४ रोजी वकीलपत्र निशाणी १९ अन्वये हजर झाली आणि प्रतिवादी क्र. ७ हिचेतर्फे प्रस्तुतचा अर्ज दिनांक २०.९.२०२५ रोजी दिलेला आहे. उपरोक्त दोन्ही तारखा विचारात घेतल्या तर प्रतिवादी क्र.७

हिस तिचा लेखी जबाब दाखल करण्यास ८ महिने २७ दिवस विलंब झालेला आहे असे दिसून येते.

७) हे सर्वज्ञात आहे की, कोणताही दावा गुणदोषावर निकाली निघणे आवश्यक आहे. त्यासाठी दोन्हीही पक्षकारांना पुरेशी संधी मिळणे गरजेचे आहे. वादी हिने प्रतिवादींचे विरुध्द प्रस्तुतचा दावा जाहिर ठरावासाठी, कायम मनाईसाठी आणि आज्ञार्थी मनाईसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. ७ हिच्या विधीज्ञांचा उपरोक्त युक्तीवाद विचारात घेतला तर त्यांना प्रकरण आपसात करण्याच्या कारणामुळे लेखी जबाब दाखल करण्यास विलंब झालेला आहे व तो विलंब त्यांनी जाणीवपुर्वक केला आहे, असे म्हणता येत नाही. या परिस्थितीत प्रतिवादी क्र.७ हिचा लेखी जबाब अभिलेखावर आला तर प्रस्तुतचा दावा गुणदोषावर निकाली करण्यास तो उपयुक्त ठरु शकतो. त्यामुळे उपरोक्त सर्व परिस्थिती, विचारात घेऊन नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने व प्रस्तुतचा दावा गुणदोषावर निकाली निघण्यासाठी, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे,

## <u>आदेश</u>

१] प्रस्तुतचा अर्ज नि.५९ हा मंजूर करण्यात येत आहे तसेच प्रतिवादी क्र. ७ हिस तिचा लेखी जबाब दाखल करण्यास झालेला ८ महिने २७ दिवसांचा विलंब माफ करण्यात येत आहे.

२] प्रतिवादी क्र. ७ हिचा लेखी जबाब अभिलेखावर घेण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by HAMBIRE DHANANJAY BHAGWANRAO
Date: 2025.10.08 12:06:24 +0530

स्थळ :मंगरुळपीर
दिनांक : ८.१०.२०२५.

( ध. भ. हंबीरे )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
मंगरुळपीर

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | C.R.Gadge |
| Name of Court | : | Shri. D. B. Hambire,<br>Civil Judge Senior Division,<br>Mangrulpir. |
| Date of Decision | : | 8.10.2025 |
| Order signed by the P.O. on | : | 8.10.2025 |
| Order Uploaded on | : | 8.10.2025 |